प्रेस नोट  दिनांक :– २४/०३/२०२३

**आरोपी लोकसेवक यांनी लाचेच्या रक्कमेची मागणी करुन ती समक्ष स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांनी ताब्यात घेतले बाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | ठाणे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव | **श्री. राजेंद्र पंढरीनाथ पाटील वय. ५७ वर्षे, पद:– जल संधारण अधिकारी, लघु पाटबंधारे, जिल्हा परिषद ठाणे. जि. ठाणे.** |
| मागितलेली लाचेची रक्कम | **५०,०००/– रुपये** |
| स्विकारली लाचेची रक्कम | **५०,०००/– रुपये** |
| थोडक्यात हकीकत | तक्रारदार यांचे गावच्या ग्रामपंचायती करीता कोल्हापुर पध्दतीचा बंधारा बांधणेकामी निधी मंजुर होवुन त्यास प्रशासकीय मंजुरी देण्यात आली असुन, यातील तक्रारदार यांचेकडे लोकसेवक श्री. राजेंद्र पंढरीनाथ पाटील यांनी सदर बंधाऱ्याचे बांधकाम सुरू करण्याबाबतची वर्क ऑर्डर देण्याकरीता मंजुर निधीच्या १ टक्के (५०,०००/–रू. पन्नास हजार रुपये ) लाचेच्या रक्कमेची मागणी करत असलेबाबत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २४/०३/२०२३ रोजी लोकसेवक यांची तक्रारदार यांनी लघु पाटबंधारे, जिल्हा परिषद ठाणे येथे येवुन समक्ष भेट घेतली असता, लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे ५०,०००/– रुपये लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले. त्या अनुषंगाने लागलीच आज दि. २४/०३/२०२३ रोजी लघु पाटबंधारे, जिल्हा परिषद ठाणे येथे सापळा आजमाविला असता, सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम स्वीकारली असता लोकसेवक यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.<br>सदरबाबत पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे येथे सुरु आहे. |

मार्गदर्शनअधिकारी– **मा. श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**
**मा. श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र ठाणे यांचेशी संपर्क करावा

---

संपर्क पत्ता :– लाप्रवि ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थळ :–acbmaharastra@mahapolice.gov.in
ईमेल–spacbthane@mahapolice. Gov.in
अॅप्लीकेशन –acbmaharastra.net,
टोल फ्रि नंबर –१०६४, दुरध्वनी कमांक –०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस्अॅप्प् कमांक –९९३०९९७७००
दिनांक :– २४/०३/२०२३

( अश्विनी पाटील )
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे.